6 APR 2017
सकाळ
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रयत शिक्षण'ला कुलगुरू कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : १३ एप्रिलला विद्यापीठात होणार दिमाखात वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतीनिमित्त देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

शालिनी कणबरकर व शिवाजी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार पुरस्काराचे वितरण १३ एप्रिलला विद्यापीठाच्या शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. एक लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू कणबरकर यांच्या स्मृती जागविण्यासाठी कणबरकर कुटुंबीय व विद्यापीठात झालेल्या सामंजस्य करारानुसार गतवर्षीपासून पुरस्कार देण्यात येतो. भाषा, साहित्य, कला, शास्त्र, क्रीडा, समाजसेवा आदी क्षेत्रांतील कर्तृत्वावान व्यक्ती किंवा संस्थेला हा पुरस्कार देण्यात येतो. गतवर्षी या पुरस्काराने संशोधक डॉ. सी. एन. आर. राव यांना गौरवण्यात आले आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, ''डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा खेडोपाडी 'रयत'च्या माध्यमातून पोहचवली. सर्व जाती, धर्मांच्या मुलांसाठी वसतिगृह काढली. त्यांनी महात्मा गांधींच्या प्रभावामुळे स्वदेशी व अनवाणी पायाने चालण्याचे व्रत घेतले तसेच महात्मा गांधी यांच्या हस्ते साताऱ्यातील छत्रपती शाहू बोर्डिंगचे नामकरण केले. छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे पहिले मोफत व वसतिगृह सुविधांनिशी महाविद्यालय सुरू केले. 'कमवा व शिका' या मंत्राने श्रमप्रतिष्ठेच्या तत्त्वज्ञानाने शिक्षणाला अपूर्वतेचा पाया घातला. त्यातून दुर्बल घटकांतील हजारो मुले उच्चशिक्षित झाली. ही संस्था आशियातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेपैकी एक मानली जाते.''

नवा माणूस घडविणाऱ्या कर्मवीर शिक्षण पद्धतीचा गौरव करण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला या पुरस्कारच्या निमित्ताने आली आहे असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.

या वेळी प्रभारी प्र. कुलगुरू डी. टी शिर्के, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, बी. ए. खोत, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी उपस्थित होते.

### दृष्टिक्षेपात 'रयत'चा विस्तार

- १५ जिल्ह्यांत ४२ महाविद्यालये
- ४३८ माध्यमिक विद्यालये
- ८ अध्यापक महाविद्यालये
- ४२ प्राथमिक, ३१ पूर्व प्राथमिक शाळा
- ८० वसतिगृह, २ आयटीआयसह अन्य ६५ विभाग
- साडेचार लाखांवर विद्यार्थी
- १५ हजार सेवक वर्ग



6 APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रयत संस्थेला विद्यापीठाचा कणबरकर पुरस्कार जाहीर

## १३ एप्रिलला सोहळा

**कोल्हापूर / प्रतिनिधीः**

कणबरकर कुटुंबीय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार यंदा साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेला देण्यात येणार आहे. येत्या शुक्रवार, १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. विद्यापीठाच्या शाहू सभागृहात कुलगुरूंच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह व शाल असे आहे, अशी माहिती कुलगुरू देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



कुलगुरू शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठ व शालिनी कणबरकर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने माजी कुलगुरू प्राचार्य यांच्या स्मृतिदिनानिमीत्त हा पुरस्कार विद्यापीठामार्फत दिला जातो. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षीचा पहिला पुरस्कार भारतरत्न एन. आर. राव यांना देण्यात आला होता. ▶▶ पान ४ वर

# रयत संस्थेला विद्यापीठाचा कणबरकर पुरस्कार जाहीर

**(पान १ वरून)** या पुरस्कारासाठी विद्यापीठ समितीमार्फत साहित्य, शास्त्र, कला, क्रीडा समाजसेवा व सामाजिक हितासाठी काम करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला जातो. त्यानंतर पुरस्कार दिला जातो. शिक्षण क्षेत्रामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेने ज्ञानगंगा खेडोपाड्यांपर्यत पोहोचवली असून गरजु मुलांसाठी मोफत शिक्षणाची व वसतीगृहाची सोय रयतने केली होती. राज्यातील १५ जिल्ह्यात ४२ महाविद्यालये, ४३८ माध्यमिक महाविद्यालये, ४२ प्राथमिक शाळा, इंग्रजी शाळा व ८० वसतीगृहे अशा ७१६ शाखांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर १५ हजार सेवक संस्थेमध्ये कार्यरत आहेत. स्वतः कणबरकर रयतच्या शिवाजी महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन करून प्राध्यापक झाले होते. त्यांचा पुरस्काराने रयतला गौरवण्याची संधी विद्यापिठाला मिळत आहे.

पत्रकार परिषदेला प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, एम. ए. काकडे, पुरस्कार समिती सदस्य बी. ए. खोत, जे. एफ. पाटील, आनंद पाटील, ए. बी. चौगुले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### कुलगुरूंच्या नावाने पुरस्कार देणारे पहिले विद्यापीठ

विद्यापीठाच्या माजी कुलगुरुच्या नावाने पुरस्कार देणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे. तर अशा पुरस्कारप्राप्त रयत संस्थेने आजपर्यंत डॉ. पी. जी. पाटील व डॉ. कणबरकर असे दोन कुलगुरू शिक्षण क्षेत्राला दिले आहेत, अशी माहिती पुरस्कार समितीकडून देण्यात आली

6 APR 2017 लोकमत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' पुरस्कार रयत शिक्षण संस्थेला

## शिवाजी विद्यापीठाकडून सन्मान; १३ एप्रिलला वितरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचे वितरण दि. १३ एप्रिलला सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि पुरस्कार निवड समितीचे सदस्य व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी बुधवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ आणि शालिनी कणबरकर यांच्यातील सामंजस्य कराराच्या अनुषंगाने विद्यापीठाचे माजी कुलगुरू व प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ या पुरस्काराची निर्मिती केली आहे. भाषा, साहित्य, शास्त्र, सामाजिक व नैसर्गिक, कला, क्रीडा, समाजसेवा, सामाजिक हिताचे काम करणारी व्यक्ती, संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. पाटील म्हणाले, शैक्षणिक व सामाजिक बांधीलकीचा विचार करून 'रयत'ची पुरस्कारासाठी निवड केली आहे. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य बी. एन. खोत, आनंद पाटील, विलास सोयम उपस्थित होते.

### शिक्षणाची गंगा खेड्यात पोहोचविणारी 'रयत'



डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात पोहोचविली. 'कमवा व शिका' या श्रमप्रतिष्ठेच्या तत्त्वाने शिक्षणाला अपूर्व पाया मिळाला. 'रयत'मुळे हजारो गरीब मुले उच्च विद्याविभूषित झाली. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांत ४२ महाविद्यालये, ४३८ माध्यमिक विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ४२ प्राथमिक, ३१ पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा, ८० वसतिगृहे, २ आयटीआय, अन्य ६५ अशा एकूण ७१७ शाखा, सुमारे साडेचार लाख विद्यार्थी आणि १५ हजार सेवक असा संस्थेचा विस्तार असल्याचे डॉ. जे. एफ. पाटील यांनी सांगितले.

> "डॉ. कणबरकर हे साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजमध्ये इंग्रजीचे अध्यापन करीत होते. या महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले. नवा माणूस घडविणाऱ्या कर्मवीर शिक्षण पद्धतीचा गौरव करण्याची संधी विद्यापीठाला याद्वारे मिळाली आहे.
>
> - डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

1. 6 APR 2017
तरुण भारत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रयत'ला 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार'

## कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : शुक्रवार १३ रोजी होणार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेला जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहामध्ये शुक्रवार १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता प्रदान करण्यात येणार आहे. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेची स्थापना २५ सप्टेंबर १९९१ मध्ये झाली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्यापाड्यातील सर्वसामान्यांपर्यंत पोहचवली. महाराष्ट्रात सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय हे पहिले मोफत व वसतिगृह असलेले महाविद्यालय होते. 'कमवा व शिका' या मंत्राने श्रमप्रतिष्ठेच्या तत्त्वज्ञानाने शिक्षणाला अपूर्व पाया रोवला. हजारो गरिब मुले उच्च विद्याविभूषित झाली. आशियातील सर्वात मोठी संस्थांपैकी रयत शिक्षण संस्था एक आहे. महाराष्ट्रात १५ जिल्ह्यात ४२ महाविद्यालये, ४३८ माध्यमिक विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ४२ प्राथमिक, ३१ पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा व ८० वसतिगृहे, २ आयटीआय, अन्य ६५ अशा एकूण ७१६ शाखा, साडेचार लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी आणि १५ हजार सेवक एवढा प्रचंड विस्तार असलेली ही संस्था आहे. नवा माणूस घडविणाऱ्या कर्मवीर शिक्षण पद्धतीचा गौरव करण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला मिळाली आहे, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबियांनी शिवाजी विद्यापीठास २५ लाख रुपयांच्या ठेवीसाठी धनादेश प्रदान केला. हा पुरस्कार देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला देण्याचे ठरले आहे. १९८० ते ८३ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कणबरकर कार्यरत होते. त्यांच्या कालावधीत अनेक विभागांची नव्याने निर्मिती झाली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. रा. कृ. कणबरकर पुरस्कार निवड समितीचे सदस्य प्राचार्य बी. ए. खोत, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. आनंद पाटील, उपकुलसचिव सोयम, अलोक जत्राटकर उपस्थित होते.

6 APR 2017 पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रयत'ला प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिंदे यांची माहिती : १३ एप्रिलला वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०१७ साठीचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार यंदा सातारा येथील रयत शिक्षण संस्थेस जाहीर झाला. याची घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली. १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून १३ एप्रिलला त्याचे वितरण होणार आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, श्रीमती शालिनी रामचंद्र कणबरकर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार त्यांच्या स्मृतिदिनी म्हणजे १३ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठामार्फत प्रदान केला जातो. या पुरस्कारासाठी भाषा, साहित्य, शास्त्र, सामाजिक व नैसर्गिक, कला, क्रीडा, समाजसेवा तसेच सामाजिक हिताचे उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांच्या कार्याचा आढावा घेऊन पुरस्कार देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. गतवर्षी पहिला पुरस्कार भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना प्रदान करण्यात आला होता.

रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात पोहोचविण्यासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ही संस्था आज आशियातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थांपैकी एक मानली जाते. महाराष्ट्राच्या १५ जिल्ह्यांसह कर्नाटकात महाविद्यालये, माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये, प्राथमिक शाळा व वसतिगृहे, आयटीआय अशा ७१६ संस्था आहेत.

पत्रकार परिषदेस प्रभारी प्र-कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य बी. ए. खोत, डॉ. जे. एफ. पाटील डॉ. आनंद पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स

## प्राचार्य कणबरकर पुरस्कार 'रयत'ला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणारा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' यंदा रयत शिक्षण संस्थेला जाहीर झाला आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी याबाबतची घोषणा केली. एक लाख ५१ हजार रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा होईल.

>> सविस्तर वृत्त...

# प्राचार्य कणबरकर पुरस्कार 'रयत'ला

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सन २०१७ साठीचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेस जाहीर झाला आहे. एक लाख ५१ हजार रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात पुरस्कार वितरण समारंभ होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'श्रीमती शालिनी कणबरकर आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य कराराच्या अनुषंगाने प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार' दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनी, १३ एप्रिल रोजी विद्यापीठामार्फत प्रदान केला जातो. पुरस्कारासाठी भाषा, साहित्य, शास्त्र, सामाजिक व नैसर्गिक, कला, क्रीडा, समाजसेवा तसेच सामाजिक हिताचे लक्षणीय काम करणारी व्यक्ती किंवा संस्था यांच्या कार्याचा आढावा घेऊन निवड केली जाते. गेल्यावर्षी पहिला पुरस्कार भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना प्रदान केला होता. रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा खेडोपाड्यात पोहोचविण्यासाठी ही संस्था स्थापन केली. संस्थेने कमवा व शिकामधून श्रमप्रतिष्ठेच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केला. एकूण ४२ महाविद्यालये, ४३८ माध्यमिक विद्यालये, आठ अध्यापक विद्यालये, ४२ प्राथमिक, ३१ पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा, ८० वसतिगृहे, दोन आयटीआय, अन्य ६५ अशा ७१६ शाखा, साडेचार लाख विद्यार्थी आणि १५ हजार सेवक असा विस्तार संस्थेचा आहे. कणबरकर यांनी साताऱ्याच्या शिवाजी महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन केले. ते तेथेच प्राचार्यही होते.'

पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. आनंद पाटील, प्राचार्य बी. एन. खोत, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

6 APR 2017

तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंप्रेरित उपयोजन काळाची गरज

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे मत : तंत्रज्ञान अधिविभागात 'टेकफेस्ट २०१७' स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी रोजच्या आयुष्यातील प्रश्न डोळसपणे समजून घेऊन त्यावर ठोस उपाय शोधण्याकरिता आपल्या ज्ञानाचा वापर केला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित 'टेकफेस्ट २०१७' प्रकल्प स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी स्पर्धेचा हेतू विषद केला.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या अनेक लहान समस्यांकडेही संशोधनात्मक नजरेने पाहावे. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा या समस्यांवर उपाययोजना शोधण्याकरिता अधिक कल्पकतेने वापर केला पाहिजे. मात्र प्रकल्पांच्या माध्यमातून केलेले हे उपयोजन लादलेले नसून स्वयंप्रेरित असले पाहिजे. अशा स्वयंप्रेरित संशोधनाला चालना देण्याकरिता विद्यार्थ्यांनी रिसर्च ग्रुप्सची स्थापना करून विविध कल्पनांना मूर्त स्वरूप द्यावे, त्याचा दस्तऐवज करून, या नूतन संशोधनाचे पेटंट घ्यावे, असे सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित 'टेकफेस्ट २०१७' प्रकल्प स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. जयदीप बागी, डॉ. पी. डी. पाटील.

तसेच कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. एक विद्यार्थी – एक नवकल्पना या सूत्रप्रमाणे गेल्यास अधिविभागाचे एक स्वतंत्र संशोधन भांडार लवकरच उभे राहील, अशी आशाही व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या संशोधकतेला प्रोत्साहन देण्याकरिता शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात या 'टेकफेस्ट'चे तीन गटांत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अधिविभागाच्या तृतीय वर्ष, अंतिम वर्ष बी. टेक. व एम. टेकच्या विद्यार्थ्यांनी या वर्षी केलेल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले. पदवी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांनी मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेट्रॉनिकस अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, फूड टेक्नॉलॉजी व एनर्जी टेक्नॉलॉजी या शाखांमधील प्रकल्पांचे सादरीकरण केले.

वर्किंग मॉडिल, लाईव्ह डेमॉन्स्ट्रेशन, पोस्टरच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे वैज्ञानिक विचार, नवकल्पकता, संशोधन पद्धती आदी मुद्यांवर परीक्षकांनी मूल्यांकन केले. टेकफेस्टचे समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले. यप्रसंगी विविध शाखांचे समन्वयक, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2017
पुढारी

# भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयकपदी डॉ. विजय ककडे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर



अध्यासन केंद्राच्या समन्वयकपदी अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांनी निवड झाली. या अध्यासनामार्फत जैन धर्म तत्त्वे व व्यवहार, त्याची शास्त्रीय बैठक याचा अभ्यास व संशोधन केले जाते. अध्यासनामार्फत पदविका अभ्यासक्रमासोबत चर्चासत्रे आयोजित केली जातात, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. माणिकराव साळुंखे, माजी खासदार कल्लापाण्णा आवाडे यांनी हे अध्यासन सुरू होण्यासाठी प्रयत्न केले. हे अध्यासन भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्र व्हावे यासाठी समस्त जैन समाजाने मदत करावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी यावेळी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

6 APR 2017

तरुण भारत

# भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयकपदी प्रा. डॉ. विजय ककडे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्राचे समन्वयक म्हणून अर्थशास्त्र विभागातील प्रा. विजय ककडे यांची नेमणूक कुलगुरू डॉ. देवानंद शिदे यांनी केली. या अध्यासनामार्फत जैन धर्म तत्त्वे व व्यवहार, त्याची शास्त्रीय बैठक याचा अभ्यास, संशोधन केले जाते. अहिंसा, अपरिग्रह, अनेकांत वाद यामुळे जैनधर्म विश्वधर्मस्वरुपी असून या अध्यासनामार्फत पदविका अभ्यासक्रमासोबत चर्चासत्रे आयोजित केली जातात. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. माणिकराव साळुंखे, कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या प्रयत्नातून सुरू झालेले अध्यासन भविष्यकाळात 'जैन धर्म' अभ्यासाचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनवणेचा प्रयत्न करणेसाठी समस्त जैन समाजाने या केंद्रास मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले.



जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2017
तरुण भारत

# भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयकपदी प्रा. डॉ. विजय ककडे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्राचे समन्वयक म्हणून अर्थशास्त्र विभागातील प्रा. विजय ककडे यांची नेमणूक कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली. या अध्यासनामार्फत जैन धर्म तत्त्वे व व्यवहार, त्याची शास्त्रीय बैठक याचा अभ्यास, संशोधन केले जाते. अहिंसा, अपरिग्रह, अनेकांत वाद यामुळे जैनधर्म विश्वधर्मस्वरुपी असून या अध्यासनामार्फत पदविका अभ्यासक्रमासोबत चर्चासत्रे आयोजित केली जातात. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. माणिकराव साळुंखे, कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या प्रयत्नातून सुरू झालेले अध्यासन भविष्यकाळात 'जैन धर्म' अभ्यासाचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनवणेचा प्रयत्न करणेसाठी समस्त जैन समाजाने या केंद्रास मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले.



जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 APR 2017
तरुण भारत

# मोडी लिपीचे आज प्रशिक्षण वर्ग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्यविभाग आणि राष्ट्रीय मोडी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी वाचन व लेखन वर्गाचे आयोजन केले आहे. गुरुवार (६) ते शनिवार (८) या कालावधीत सायंकाळी ५ ते ७ या वेळेत विद्यापीठ हायस्कूलमध्ये हे प्रशिक्षण वर्ग होणार आहेत. या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गातील गावकामगार चावडी, मंडल अधिकारी, तहसील कार्यालय, प्रांताधिकारी, भूमापन अधिकारी कार्यालय, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा प्रशासन आदी शासकीय कार्यालयांत मोडीची कागदपत्रे धूळ खात पडली आहेत.